॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उद्या शुक्रवार दि. ९ फेब्रुवारी २०२४ रोजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील येणार आहेत.

त्यांच्या हस्ते पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभागाच्या इमारतीचे आणि नव्याने सुरु झालेल्या योगशास्त्र पदव्युत्तर विभागाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी असून प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांची उपस्थिती असणार आहे. उद्घाटनानंतर मुख्य सोहळा दुपारी १२ वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात होणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. ८ (प्रतिनिधी) रमाबाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र प्रशाळेअंतर्गत असलेल्या डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने गीतगायन व काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली.

व्य.प. सदस्य डॉ. पवित्रा पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. अजय पाटील अध्यक्षस्थानी होते. सुकन्या जाधव आणि माधुरी जाधव यांना विभागून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. अमृता महाजन द्वितीय तर राखी शेंडगे हिने तृतीय क्रमांक मिळवला. दामिनी पाटील व गोपाल पाटील यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. परीक्षक म्हणून डॉ. अभय मनसरे, डॉ. बाळासाहेब सुर्यवंशी यांनी काम पाहिले. डॉ. पवित्रा पाटील नितीन सांगवी व डॉ. उमेश गोगडीया यांच्या हस्ते पारीतोषिके देण्यात आली. डॉ. विजय घोरपडे यांनी प्रास्ताविक केले. सुकन्या जाधव हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले डॉ. समाधान बनसोडे यांनी आभार मानले.

………………………………………………………………………………………………………………………..

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ८ फेब्रुवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी